महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर https://jeevandeepvarta.com मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे Rs.2/-

शुक्रवार ■ 31 जानेवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 216 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मनोज जरांगे पाटलांचे उपोषण स्थगित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मराठा आरक्षणासाठी गेल्या काही महिन्यांपासून लढा देत असलेले नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज आपले उपोषण मागे घेतले आहे. भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी त्यांना ज्यूस देऊन हे उपोषण सोडवले. यादरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे यांचे आंदोलन आणि त्यांच्या मागण्यांसंबंधी प्रतिक्रिया दिली आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "कायद्याच्या चौकटीतील ज्या ज्या मागण्या ते करतील किंवा कोणीही करेल त्या मागण्या आम्ही निश्चित मान्य करू. पण आमचं म्हणणं एवढंच आहे की, भारताचे संविधान आणि कायदा यांच्या चौकटीतील मागण्या असल्या पाहिजेत. त्या असल्या तर योग्य प्रतिसाद सरकारकडून मिळेल." दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी त्यांचे उपोषण स्थगित केले असले तरी त्यांनी पुढे मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा यावेळी सरकारला दिला आहे. सग्या सोयऱ्यांची अमलबजावणी आम्हाला पाहिजेच आहे. ती झाली नाही तर आता लवकरच मुंबईतल्या आंदोलनाची तारीख जाहीर करणार असल्याचंही मनोज जरांगे म्हणाले.



### देवेंद्र फडणवीस नेमकं काय म्हणाले?

**मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सोडलं याचा आनंद आहे असे फडणवीस म्हणाले. पुढे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, "आम्ही मराठा समाजाच्या संदर्भात जे काही निर्णय घेतले आहेत ते महायुतीच्या सरकारनेच घेतले आहेत. हे सगळे निर्माण झालेले प्रश्न कायद्याच्या चौकटीत सोडवणं ही आमची जबाबदारी आहे, आम्ही तो प्रयत्न करतोय."**

### अंमलबजावणी न झाल्यास..

मुंबईत जर आंदोलन सुरु केलं तर तिथून काही माघार घेणार नाही. आपल्याला मुंबईला पोलिसांनी मारलं तरीही पोलिसांना बोट लावायचं नाही. पण, मंत्र्यांना आणि त्यांच्या पोरांना धरायचं आणि हाणायचं असा इशाराच मनोज जरांगेंनी दिला. तसेच, आता हे आंदोलन स्थगित करत आहे, या जागेवर सभामंडप करायचा आहे. यापुढे शक्यतो आता उपोषण करायचं नाही, समोरासमोर लढायचं आहे, असेही मनोज जरांगे म्हणाले आहेत. लवकर अमलबजावणी न झाल्यास मुंबईच्या आंदोलनाची तारीख जाहीर करेन, तेव्हा मुंबई जाम होऊ शकते, यावेळी मराठे मागे येऊ शकत नाहीत, असंही मनोज जरांगे म्हणाले

# कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी दत्ता गायकवाड बिनविरोध



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण- कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी भाजपचे दत्ता गायकवाड हे बिनविरोध निवडून आले आहेत. दत्ता गायकवाड यांचा एकमेव उमेदवारी अर्ज असल्याने त्यांची बिनविरोधनिवड झाली आहे. दत्ता गायकवाड हे भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांचे कट्टर समर्थक आहेत. सभापती पदी बिनविरोध निवड होताच बाजार समितीचे उत्पन्न वाढीसाठी विविध प्रयत्न करणार. तसेच शेतकारी, शेतमाल विक्रेते, ग्राहक आणि समितीचे सदस्य यांना विश्वासात घेऊन विविध योजना राबविण्याचा मानस दत्ता गायकवाड यांनी व्यक्त केला आहे. दत्ता गायकवाड यांच्या स्वागतासाठी भाजपचे आमदार किसन कथोरे, सुलभा गायकवाड यांच्यासह भाजप जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, पदाधिकारी अभिमन्यू गायकवाड यांच्यासह शिंदे सेनेचे शहर प्रमुख निलेश शिंदे आणि पदाधिकारी प्रशांत काळे हे उपस्थित होते.बाजार समितीच्या सभापती पदी यापूर्वी रविंद्र घोडविंदे होते. घोडविंदे यांच्या पश्चात शिंदे सेनेचे कपील थळे यांनी सहा वर्षे सभापती पदाचा कारभार पाहिला. थळे यांच्या पश्चात आत्ता दत्ता गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे भाजपसह महायुतीमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



# उल्हासनगर पालिका इमारत धोकादायक




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : उल्हासनगर महापालिका मुख्यालयाची इमारतीचे बांधकाम अतिधोकादायक झाली असल्याची बाब बुधवारी झालेल्या ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उघडकीस आली. हि इमारत तातडीने दुसऱ्या जागेत स्थलांतरित करण्याचे आदेश देत नव्या इमारतीच्या बांधकामासाठी आवश्यक असलेला निधी नगरविकास विभागामार्फत देण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीत दिले. उल्हासनगर महापालिकेची इमारत तळ अधिक दोन मजली आहे. ही इमारत ४० ते ४५ वर्षे जुनी आहे. या इमारतीच्या खांबांना तडे गेले असून ही इमारत अतिधोकादायक असल्याचे समोर आले आहे. हा मुद्दा भाजपचे आमदार कुमार आयलानी यांनी बुधवारी झालेल्या ठाणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित करत याबाबत तातडीने निर्णय घेण्याची सुचना दिली. या इमारतीत अधिकारी, कर्मचारी वर्ग बसतो. शहरातील नागरिक येथे कामानिमित्ताने येतात. यामुळे इमारतीत दररोज चारशे ते पाचशे जणांचा वावर असतो. एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. त्यावर पालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी पालिका इमारत अतिधोकादायक असल्याचे स्पष्ट केले. पालिका इमारतीच्या खांबांना तडा गेले आहेत. या इमारतीचे बांधकामाचे सरचनात्मक परिक्षण करण्यात आले. त्यात ही इमारत अतिधोकादायक असल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे पालिका मुख्यालयातील कार्यालया इतरत्र स्थलांतरित करण्यासाठी पर्यायी जागाही शोधली आहे, असे आव्हाळे यांनी सांगितले. तर, पर्यायी जागेत मुख्यालयातील कार्यालये तातडीने स्थलांतरित करण्याचे आदेश देत नव्या इमारतीसाठी आवश्यक असलेला निधी नगरविकास विभागामार्फत टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

**मुख्यालय दुसऱ्या जागेत स्थलांतरित करण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेश**

### वाढीव पाण्यासाठी प्रयत्न

मुंबई महानगरातील सर्वच शहरांची लोकसंख्या वाढत आहे. या शहरांना पाणी टंचाईची समस्या जाणवत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याचे काम सुरू आहे. शाई, काळू, जांभवली, मुंबरी, देहरजे, सुर्या, बाळगंगा, कुशवली या धरणांबाबत चर्चा झाली. सुर्या धरणातून मिरा-भाईंदर आणि वसई शहराला पाणी पुरवठा केल्यानंतर या धरणातील अतिरिक्त पाणी ठाणे शहराला देण्याबाबतचा निर्णय झालेला आहे. मलनिसारण प्रकल्पाचे पाणी पिण्याव्यतिरिक्त इतर कामांसाठी, उद्योग आणि बांधकामासाठी वापरणे गरजेचे आहे. त्याची जिल्ह्यात काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे. त्यामुळे पिण्याचे पाणी केवळ पिण्यासाठी वापरता येईल, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### जिल्ह्यातीलबेकायदा शाळांवर होणार कारवाई

ठाणे जिल्ह्यातील बेकायदा शाळांना नोटीसा बजावणे, गुन्हे दाखल करणे, अशी कारवाई होते पण, तरीही शाळा सुरू राहत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. अशा शाळांना परिणामकारक कारवाई करण्याची मागणी आमदार संजय केळकर यांनी केली. तर, अनेक शाळांना शासनाकडून इरादा पत्र मिळाले आहे. पण, प्रस्ताव मान्यतेच्या प्रतिक्षेत आहेत. इमारत बांधकामांना बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मिळत नाही. त्यामुळे अशा शाळाही बेकायदा शाळांच्या यादीत येतात, असा मुद्दा माजी मंत्री रविंद्र चव्हाण यांनी मांडला. त्यावर शाळांची तपासणी करून त्याची वर्गवारी करण्यात यावी. त्यात ज्या शाळा नियमात बसू शक्त नाहीत, अशा शाळा बंद करण्याची कारवाई करण्यात यावी, अशा सुचना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या.

# कल्याण मुरबाड रेल्वे मार्गाविरोधात स्थानिक शेतकरी आक्रमक

## बाळाचा वापर केल्यास आत्मदहनाचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण मुरबाड रेल्वे मार्गासाठी लागणा-या जमीन मोजणीस तालुक्यातील मानिवली गावच्या शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केला आहे, हा विरोध मोडत प्रशासनाने बळाचा वापर केला तर आम्ही सामुहिक आत्मदहन करणाच्या इशारा येथील शेतकऱ्यांनी दिला आहे, त्यामुळे रेल्वे प्रशासन यावर काय भूमिका घेते यावर पुढील अंदोलनाची दिशा ठरणार आहे.कल्याण मुरबाड रेल्वे मार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमीन अधिग्रहण करण्यासाठी एकूण१५००शे कोटी खर्च अपेक्षित आहे, परंतु अद्यापही याबाबत अनेक शंका-कु शंका शेतकऱ्यांच्या आहे, या मार्गासाठी काही गावातून रेल्वे जमीन मोजणी झाली असली तरी मानिवली गावातील शेतकऱ्यांचा विरोध कायम आहे, याचे कारण म्हणजे, आज या भागात रेल्वेने नेमलेल्या एजन्शी चे अधिकारी, कर्मचारी जमीन मोजणीस आले होते, मात्र येथील शेतकऱ्यांनी याला प्रखर विरोध केला, त्यांचे म्हणणे आहे की, यामुळे आमच्या गावातील१७००से गुंठे जमीन बाधित होणार आहे, तर २५००से फळझाडे जात आहेत, शिवाय२५ते३०घरावर बुलडोझर फिरणार आहे, आम्ही कायमचे बेघर होणार आहे, असे असताना रेल्वे प्रशासन, ना लोकप्रतिनिधी, ना मंत्री, आमच्याशी चर्चा करत नाही, बैठक घेत नाहीत, ना आमच्या साठी काय करणार आहोत हे सांगत नाहीत,मग आम्ही आमचे आयुष्य कसे उध्वस्त होऊ देणार? त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आम्ही आमच्या जमिनी देणार नाही, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा असा आहे का 'सबका साथ सबका विकास' बळी राजाला भकास करून कसला विकास करणार आहेत,? असा सवाल यावेळी शेतकरी सुनील दत्ता गायकर यांनी उपस्थित केला,यावेळी चंद्रकांत गणपत गायकर, संतोष राम वारघडे, रुपेश गायकर, सुनील गायकर, बाळाराम माळी, रामलाल सहानी, विजय माळी, जयवंती गायकर, कल्याणी बफाळे, आदी शेतकरी, पुरुष, महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते,आमचा कल्याण मुरबाड रेल्वे ला विरोध नाही, आमची घरे वाचवून पर्यायी जागा आहे, तेथून रेल्वे न्हावी, म्हणजे विकास पण होईल व आमचे जीवन पण उध्वस्त होणार नाही, याउलट आमचा विरोध डावलून बळाचा वापर केला तर असे आम्ही बरबाद होणार आहोतच, त्यापेक्षा आम्ही सामूहिक आत्मदहन करण्याची तयारी ठेवली असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणें आहे, त्यामुळे प्रशासनाने यावर गंभीरतेने विचार करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.



# शिळफाटा रस्ता पाच दिवस बंद !

> समर्पित जलदगती रेल्वे मालवाहू विभागातर्फे (डीएफसीसी) निळजे रेल्वे उड्डाण पुलाच्या पुनर्बांधणीचे काम पाच दिवसाच्या कालावधीत करण्यात येणार आहे. या कालावधीत पलावा जंक्शनकडे येणारी हलकी, मध्यम वाहनांची वाहतूक पर्यायी रस्ते मार्गाने वळविण्यात येणार आहे. अवजड वाहनांना हा रस्ता बंद असेल. हे काम पूर्ण झाल्यानंतर शिळफाटा रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या सुटण्यास मोठे साहाय्य होणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी या कालावधीत सहकार्य करावे. - पंकज शिरसाट, उपायुक्त, वाहतूक विभाग.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण शिळफाटा रस्त्यावरील पलावा जंक्शन जवळील निळजे रेल्वे उड्डाण पुलाचे काम समर्पित जलदगती रेल्वे मालवाहू विभागाकडून ५ फेब्रुवारी रोजी रात्री १२ ते १० फेब्रुवारी रोजी रात्री १२ या पाच दिवसांच्या कालावधीत करण्यात येणार आहे. या कालावधीत शिळफाटा रस्त्यावर पलावा जंक्शनकडे येणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी दिली. यासंदर्भातची अधिसूचना शुक्रवारी प्रसिध्द केली जाणार आहे, असे ते म्हणाले. दिल्ली ते जेएनपीटी समर्पित जलदगती रेल्वे मालवाहू विभागाचे काम रेल्वे प्रशासनाकडून सुरू आहे. हा रेल्वे मार्ग शिळफाटा येथे पलावा जंक्शन एक्सपेरिया मॉलजवळील निळजे रेल्वे उड्डाण पुलाखालून जाणार आहे. या पुलाच्या दोन्ही बाजुच्या पृष्ठभागालगतचे भरावाचे काम पूर्ण झाले आहे. विभागाकडून निळजे रेल्वे मार्गावरील पुलाच्या पुनर्बांधणीचे काम सुरू करण्यात येणार आहे. शिळफाटा रस्त्यावरील सततच्या वाहन वर्दळीत ही कामे करणे शक्य नसल्याने रेल्वेने पाच दिवस पलावा जंक्शनकडे येणारी सर्व प्रकारची वाहतूक पाच दिवस बंद ठेऊन ही कामे करण्याचा निर्णय घेतला आहे. या कामासाठी ५ ते १० फेब्रुवारी या कालावधीत शिळफाटा रस्त्यावरील पलावा जंक्शनकडे जाणारी हलकी, जड, अवजड वाहनांचा प्रवास बंद ठेवण्यात येणार आहे.

# कल्याण तालुका ऊबाठा शिवसेना अध्यक्ष पदी नरेश सुरोशी यांची निवड



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण तालुका प्रतिनिधी

नरेश सुरोशी यांची कल्याण तालुका ऊ बा ठा शिवसेना अध्यक्ष पदी निवड.कल्याण कल्याण तालुका उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना तालुका प्रमुख म्हणून नरेश अनंता सुरोशी यांची निवड नुकताच पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. नरेश सुरोशी हे रायते गावातील तरुण शिवसैनिक असून त्यांचे वडील अनंता सुरोशी यांनी पंधरा वर्ष शिवसेना कल्याण तालुका प्रनुख पद सांभाळले होते. निष्ठावंत शिवसैनिक ही त्यांची ओळख आहे त्यांच्या निवडीमुळे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला एक तरुण आध्यक्ष लाभला आहे. त्यांच्या या निवडीचे सर्व थरातून अभिनंदन होतं आहे. त्यांच्या सोबत रमेश बांगर, प्रदीप वारे यांचा ही तालुका कार्यकारणीत समावेश करण्यात आलेला आहे.

## गीतासार



य एनं वेत्ति हन्तारं
यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं
हन्ति न हन्यते ॥२- १९॥

जो या आत्म्याला मारणारा समजतो, तसेच जो हा (आत्मा) मेला असे मानतो, ते दोघेही अज्ञानी आहेत. कारण हा आत्मा वास्तविक पाहता कोणाला मारीत नाही आणि कोणाकडून मारलाही जात नाही. ॥ २-१९ ॥

न जायते म्रियते वा
कदाचिन्नायं भूत्वा
भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं
पुराणो न हन्यते हन्यमाने
शरीरे ॥२- २०॥

हा आत्मा कधीही जन्मत नाही आणि मरतही नाही. तसेच हा एकदा उत्पन्न झाल्यावर पुन्हा उत्पन्न होणारा नाही; कारण हा जन्म नसलेला, नित्य, सनातन आणि प्राचीन आहे. शरीर मारले गेले तरी हा आत्मा मारला जात नाही. ॥ २-२० ॥

वेदाविनाशिनं नित्यं य
एनमजमव्ययम् ।
कथं स पुरुषः पार्थ
कं घातयति हन्ति
कम् ॥२- २१॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), जो पुरुष हा आत्मा नाशरहित, नित्य, न जन्मणारा आणि न बदलणारा आहे, हे जाणतो, तो कोणाला कसा ठार करवील किंवा कोणाला कसा ठार करील? ॥ २-२१ ॥

## आरोग्य टिप्स

### काळी हळद : फायदे



काळी हळद प्रामुख्याने भारताच्या उत्तर-पूर्व राज्यांमध्ये पिकवली जाते. ही हळद आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानली जाते. त्वचेसाठीही ही औषधापेक्षा कमी नसते.

काळी हळद ही पोटाच्या समस्यांवर अधिक गुणकारी आहे. काळ्या हळदीची पावडर पाण्यात मिसळून पिल्याने, ती पचनक्रिया सुधारण्यास मदत करते. जर कोणाला पोटदुखी किंवा गॅसची समस्या असेल तर ही हळद खूप फायदेशीर ठरेल.

वाढत्या वयाबरोबर सांधेदुखीची समस्या जाणवू लागते. सांधेदुखीच्या वेदना वाढू लागल्यावर तर अँटीऑक्सिडंट आणि अँटीफंगल गुणधर्मांनी समृद्ध काळ्या हळदीची पेस्ट प्रभावित भागात लावल्यास सूज कमी होऊन आराम मिळतो.

पिवळ्या हळदीप्रमाणेच काळी हळदही त्वचेसाठी फायदेशीर असते. हळद मध मिसळून चेहऱ्यावर लावल्यास ग्लो येतो. याशिवाय चेहऱ्यावरील काळे डाग आणि पिंपल्सपासूनही तुम्हाला सुटका मिळेल.

किरकोळ जखम, त्वचा सोलवटणे यासाठी अनेक प्रकारच्या क्रीम्सचा वापर केला जातो, पण जर तुम्हाला आयुर्वेदिक उपचार हवे असतील तर दुखापती झालेल्या भागावर काळ्या हळदीची पेस्ट लावा. असे केल्याने जखमा लवकर बरी होते.

# स्मितहास्य



एका हॉटेलमधील वेटरने एका ग्राहकाला सकाळच्या वेळी स्मितहास्यासह चहा दिला. त्या वेटरच्या स्मितहास्याने कमाल केली. त्या ग्राहकाचं आयुष्य अगदी एकसुरी होतं... पण...त्या चहाच्या एका कपाने जणू त्याच्या जीवनात नव्या शाखा फुटल्या! तो आनंदित झाला आणि त्याने रुपये ५० टिप स्वरूपात वेटरला दिले. वेटरला कधी कल्पनाही नव्हती की, एका स्मितहास्यासाठी त्याला इतकी रक्कम बक्षिस मिळेल. तोही आनंदित झाला आणि त्याने रुपये २० एका भिकाऱ्याच्या हातात दिले. सकाळीच रुपये २० मिळतील असं त्या भिकाऱ्यालाही वाटलं नव्हतं... तो आनंदित झाला आणि काल उपाशी झोपलेल्या आपल्या आईला भेटण्यासाठी धावत निघाला... रस्त्यात वर्दळ असलेल्या रस्त्यावर तो एका लहान गाढवाला धावत उचलतो आणि प्रेमाने त्याच्या डोक्यावरून हात फिरवतो.

हे दृश्य एका महागड्या गाडीत बसलेल्या अतिश्रीमंताने पाहिलं आणि त्याच्या मनात आलं की, ज्या गाढवाशी आपला काहीच संबंध नाही, त्यावरही प्रेम करणारा हा भिकारी खरा श्रीमंत आहे... आणि मी, जो माझ्या कंपनीतील मजुरांना, गाडीच्या ड्रायव्हरला किंवा माझ्या कुटुंबीयांना दुर्लक्षित करतो, खरा श्रीमंत कसा असू शकतो? त्या श्रीमंताने आनंदाने ड्रायव्हरला आणि कंपनीतील मजुरांना प्रत्येकी रुपये १,००० बक्षीस दिलेत. शेठकडून मिळालेल्या १,००० रुपयांनी ड्रायव्हर खूप आनंदित झाला आणि तो कुटुंबासोबत समुद्र किनारी फिरायला गेला. तो आज खूप आनंदी होता. तो गाडीतून उतरला आणि त्याचवेळी एक तरुण त्याच्या जवळच उभा होता... दोघांच्या नजरा क्षणभरासाठी मिळाल्या आणि तो तरुण समुद्राला पाठ करून परत चालू लागला... ड्रायव्हरने विचारलं, "तुम्ही कोण? आणि अचानक मागे का फिरलात?" त्या अज्ञात तरुणाने उत्तर दिलं, "भाऊ, मी जीवनाला कंटाळलेला माणूस आहे, आत्महत्या करायला आलो होतो. "पण..." "मी एक संकल्प केला होता की, जर एखाद्या माणसाच्या चेहऱ्यावर हसू पाहिलं तर आत्महत्या करणार नाही." "तुमच्या चेहऱ्यावरील आनंदाने माझं आयुष्य वाचवलं आहे...! थँक यु!

याप्रकारे, आपल्या चेहऱ्यावरचं एक हसू कित्येकांच्या जीवनात अमर्याद आनंद निर्माण करू शकतं, ज्याची आपण कल्पनाही करू शकत नाही. आता आपण कुठे आहोत? ज्या गोष्टी आपल्या हातात नाहीत, अशा भविष्याच्या चुकीच्या कल्पनांमध्ये आपण आपल्या जीवनातील आनंद हरवून बसतो... म्हणून प्रत्येक क्षण आनंदाने जगायला शिका. जगणं रोज शिकवतं की, "जिवंत राहायला शिक, सांधत राहशील तरी तुटणं थांबणार नाही, पण शिवायला शिक!" म्हणून, "मन भरून जगा, मनात भरून नाही."

# सामाजिक संस्थांच्या मदतीने केडीएमसी क्षेत्रात स्वच्छता उपाययोजना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




**कल्याण** : महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांचे निर्देशानुसार व अतिरीक्त आयुक्त श्री. हर्षल गायकवाड यांचे मार्गदर्शाखाली कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन अधिनियमाची तसेच एकल वापर प्लास्टीक बंदी अधिनियमाची चोखपणे अंमलबजावणी होण्यासाठी, महापालिकेमार्फत विविध स्तरावरुन प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. महापालिका क्षेत्रात विलगीकृत कचरा संकलन, कच-याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे, जी.व्ही.पी निर्मुलन , एकल वापर प्लास्टीक बंदी कारवाई इ; या नियमीत स्वरुपात करण्यात येत आहेत. याचबरोबर महापालिकेमार्फत विविध अभियान राबवून त्या माध्यमातून स्वच्छता कार्यवाही, तलाव स्वच्छता, निर्माल्य संकलन इ. कार्यवाही देखीलमोठया प्रमाणात करण्यात येत असतात. सदर कार्यवाही हया अधिक गुणवत्तापुर्वक व परिणामकारक होणे आवश्यक असून याकरीता महापालिका क्षेत्रातील सामाजिक तसेच पर्यावरण क्षेत्रात कार्यरत विविध संस्थाचे सहकार्य लक्षात घेता महापालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन कार्यवाही तसेच एकल वापर प्लास्टीक बंदी कार्यवाही अधिक प्रखरपणे करण्याच्या हेतुने तसेच सदर कार्यवाहीची अंमलबजावणी चोखपणे करणेकामी पुढील उपाययोजना ठरविण्यासाठी महापालिका क्षेत्रातील सामाजिक तसेच पर्यावरण क्षेत्रात कार्यरत विविध संस्थासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर बैठक घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त अतुल पाटील यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली असून बैठकीस घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या सहा. आयुक्त प्रिती गाडे, मुख्य स्वच्छता अधिकारी वसंत देगलूरकर, परिमंडळ-1चे उप मुख्य स्वच्छता अधिकारी मोहनीश गडे तसेच स्वच्छ भारत अभियानाचे ब्रॅंड अॅम्बेसीडर डॉ. प्रशांत पाटील, डॉ. रुपींदर कौर यांचेसह विवेकानंद सेवा मंडळ, पर्यावरण दक्षता मंडळ, सक्षम कन्या विकास संस्था, सक्षम नारी सेवाभावी संस्था, सुयश संस्था, उर्जा फांऊडेशन या संस्थाचे प्रतिनीधी यांचेसह महापालिकेचे स्वच्छता अधिकारी, महापालिका क्षेत्रातील कार्यरत पर्यावरण रक्षक हे उपस्थित होते. या बैठकीमध्ये एकल वापर प्लास्टीक बंदी, विलगीकृत कचरा संकलन, कचरा संकलन व वाहतुकीकरीता आवश्यक नियोजन तसेच याकामी नागरीकांमध्ये जनजागृती तसेच महत्वाच्या विषयांच्या कार्यशाळेचे आयोजन इ.बाबत यशस्वीपणे चर्चा करण्यात आलेली असून या कार्यवाही दरम्यान महापालिका क्षेत्रातील सर्व सामाजिक तसेच पर्यावरण क्षेत्रात कार्यरत विविध संस्थामार्फत महापालिकेस सहकार्य देणेबाबत आश्वासन देण्यात आले. पुढील कालावधीमध्ये प्रभागक्षेत्र स्तरावर सर्व संस्थाना सहभागी करुन महापालिकेमार्फत जनजागृती कार्यवाही तसेच वेळ पडल्यास दंडात्मक कार्यवाही अधिक प्रखरपणे करण्यात येणार असल्याबाबत विभागाचे उप आयुक्त अतुल पाटील यांचेमार्फत आवाहन करण्यात आले.

# शिवसह्याद्री प्रतिष्ठानचा पाचवा वर्धापनदिन संपन्न




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्वेतील चिंचपाडा परिसरात शिवसह्याद्री प्रतिष्ठाण महाराष्ट्र कल्याण विभाग मार्फत ५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य स्नेह मेळावा रविवारी संपन्न झाला. शिवसह्याद्री प्रतिष्ठान कल्याण विभागच्या वतीने सामाजिक, कला,क्रिडा, सांस्कृतिक क्षेत्र, तसेच आप्तकालीन परिस्थिती मदतीचा हात, आरोग्य शिबिरे, गड किल्ले सफाई मोहिम, रक्तदान शिबिर अशी भरीव कामगिरी करीत आपल्या सामाजिक कार्याचा वसा जोपसत आहे.

मेळाव्याची सुरूवात छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलन करीत सुरुवात झाली. प्रमुख उपस्थिती म्हणून शिवसेना शिंदे गटाचे कल्याण शहर प्रमुख निलेश शिंदे, भाजपा मंडळ अध्यक्ष संजय मोरे, अमोल भिसे राज्य सचिव - महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेना, माजी परिवहन सभापती सुभाष म्हस्के, वसंत भोईर शिवसेना सहसंर्पक प्रमूख विजय जोशी, सुभाष ढोणे आदी मान्यवर उपस्थित होते. नारी शक्ती सन्मान म्हणून रिक्षा चालक महिल यांना सन्मानित करण्यात आले. प्रशस्ती पत्रक देत उत्कृष्ट पत्रकार म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात पत्रकार दत्तात्रेय बाठे, पत्रकार कुणाल म्हात्रे, पत्रकार रघुनाथ सुराळकर यांना हा पुरस्कार देण्यात आले.

लकी ड्रॉ मध्ये शिवसहयाद्रीची मानाची पैठणी सहीत 2 नथ तसेच ३ पैठणी साडी आदी बक्षीसे देण्यात आली. सुमारे ३ हजार नागरिकांसाठी स्नेह भोजनाची व्यवस्था केली होती. यामध्ये कल्याण स्थित चिंचपाडा, नांदीवली, माणेरे, आडीवली याठिकाणी वास्तव्यास असलेले पश्चिम महाराष्ट्र व कोल्हापूर जिल्ह्यातील वास्तव्यास असलेल्या सभासदांची सख्या मोठ्या प्रमाणात होती. सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून संदेश पाटील ग्रुप यांचा लावणीचा कार्यक्रम सादर करण्यात आला. हितंचितक मान्यवर यांचे आभार संस्थापक अध्यक्ष सतिश पेडणेकर यांनी मानले.

# विविध देशांच्या करन्सी व पोस्टल स्टॅम्पचे प्रदर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : 193 देशांच्या ग्लोबल करन्सी नोट व पोस्टल स्टॅम्प प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आंतर शालेय विज्ञान प्रदर्शन व पोस्टर् स्पर्धा देखील पार पडली. दोन दिवस आयोजित केलेल्या या प्रदर्शनाला सुमारे 30 हजार विद्यार्थ्यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी 2014 पासून आयोजक संतोष डावखर हे डावखर फाउंडेशन, रिजन्सी ग्रुप, समर्थ पेट्रोलियम, एनए सोल्युशन, डावखर फाउंडेशन, डावखर फिल्म्स विविध विषयांवर आधारित प्रदर्शनाचे आयोजन करत आहेत. या वर्षी परिसरातील 45 शाळा सहभागी झाल्या आहेत.

विद्यार्थ्यां मधील कला गुणांना संधी देण्यासाठी त्यांच्यातल्या शास्त्रज्ञांना वाव देण्यासाठी कल्याण डोंबिवली परिसरातील विद्यार्थ्यांसाठी आंतर शालेय विज्ञान प्रदर्शन पोस्टर् स्पर्धा तसेच ग्लोबल करन्सी नोट व पोस्टल स्टॅम्प प्रदर्शनाचे आयोजन डोंबिवली पूर्वेतील रिजन्सी अनंतम येथे दोन दिवस करण्यात आले होते. हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य होते. शाळांसाठी बसची सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विज्ञानाबद्दल आणि पोस्टल स्टॅम्प बद्दल संपूर्ण माहिती घेण्याची संधी उपलब्ध झाली. 193 देशांच्या नोट्स आणि पोस्टल स्टॅम्प प्रदर्शन तसेच विज्ञान या विषयांमध्ये स्वारस्य घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी विशेष आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन व पोस्टर्स स्पर्धा आयोजित करण्यात आली. जिंकणाऱ्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र देण्यात आले असल्याची माहिती संतोष डावखर यांनी दिली.

# क्षेत्रीय भेटीत कुचराई केल्यास महसूल अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाचा बडगा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : 193 देशांच्या ग्लोबल करन्सी नोट व पोस्टल स्टॅम्प प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून आंतर शालेय विज्ञान प्रदर्शन व पोस्टर् स्पर्धा देखील पार पडली. दोन दिवस आयोजित केलेल्या या प्रदर्शनाला सुमारे 30 हजार विद्यार्थ्यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी 2014 पासून आयोजक संतोष डावखर हे डावखर फाउंडेशन, रिजन्सी ग्रुप, समर्थ पेट्रोलियम, एनए सोल्युशन, डावखर फाउंडेशन, डावखर फिल्म्स विविध विषयांवर आधारित प्रदर्शनाचे आयोजन करत आहेत. या वर्षी परिसरातील 45 शाळा सहभागी झाल्या आहेत.

विद्यार्थ्यां मधील कला गुणांना संधी देण्यासाठी त्यांच्यातल्या शास्त्रज्ञांना वाव देण्यासाठी कल्याण डोंबिवली परिसरातील विद्यार्थ्यांसाठी आंतर शालेय विज्ञान प्रदर्शन पोस्टर् स्पर्धा तसेच ग्लोबल करन्सी नोट व पोस्टल स्टॅम्प प्रदर्शनाचे आयोजन डोंबिवली पूर्वेतील रिजन्सी अनंतम येथे दोन दिवस करण्यात आले होते. हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य होते. शाळांसाठी बसची सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विज्ञानाबद्दल आणि पोस्टल स्टॅम्प बद्दल संपूर्ण माहिती घेण्याची संधी उपलब्ध झाली. 193 देशांच्या नोट्स आणि पोस्टल स्टॅम्प प्रदर्शन तसेच विज्ञान या विषयांमध्ये स्वारस्य घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी विशेष आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन व पोस्टर्स स्पर्धा आयोजित करण्यात आली. जिंकणाऱ्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र देण्यात आले असल्याची माहिती संतोष डावखर यांनी दिली.

# केडीएमसीत हुतात्म्यांना आदरांजली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




**ठाणे** : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी दिनी आज महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस माहिती व जनसंपर्क विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

या समयी उपस्थित महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे, मनोज सांगळे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार, उद्यान अधिक्षक अनिल तामोरे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी देखील त्यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण केली, यावेळी देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून आदरांजली वाहण्यात आली.

डोंबिवली (पश्चिम) येथील महात्मा गांधी उद्यानातील, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास महापालिका परिमंडळ-2 चे उपायुक्त अवधुत तावडे यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. या समयी उपस्थित 7/ह प्रभागाचे सहा.आयुक्त राजेश सावंत व इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील महात्मा गांधी प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन आदरांजली वाहिली.

# विद्यार्थ्यांनी चाकोरी बाहेरच्या वाटा निवडाव्यात

**- डॉ किशोर गवस**




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** : आमच्या काळात करिअर करीता जास्तीत जास्त डॉक्टर, इंजिनिअर ईतकेच मार्ग होते. परंतु, बदलत्या काळात अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे कला, क्रीडा, आयटी विभाग सह करिअरच्या अनेक वाटा निर्माण झाल्या आहेत. यात आपण कुठे बसतो यांचं विद्यार्थ्यांनी आत्मपरीक्षण करावं आणि आपलं वेगळे अस्तित्व निर्माण करणारे व भविष्य उज्वल करण्यासाठी चाकोरी च्या बाहेरील करिअरच्या वाटा निवडायला हव्यात. असा मोलाचा सल्ला उल्हासनगर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. किशोर गवस यांनी विद्यार्थ्यांना दिला. ते उल्हासनगर येथील एस एस टी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन ' गुंज -२०२५ " च्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. उल्हासनगर मधुन एस एस टी महाविद्यालय आपल्या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळया संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देतेय, तसेच रेश्मा राठोड सारख्या अनेक विद्यार्थ्यांना कला क्रीडा क्षेत्रातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर आपलं कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी सज्ज करते आहे. ही समाधानाची बाब आहे. या महाविद्यालयाच्या मदतीमुळे उल्हासनगर मधुन यावर्षी मतदानाच्या टक्केवारीत ही वाढ झालीय. मनपाच्या अनेक सामाजिक उपक्रमांत सहभागी होवून एस एस टी महाविद्यालय आपली सामाजिक बांधिलकी जपत असते. यातुन सुयोग्य नागरिक घडतील हा विश्वास ही त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी विद्यार्थ्यांनी अनेक गीत, संगीत, नृत्य, नाटिकां द्वारे गीत गायन याद्वारे विविध कलांचे सादरीकरण केले. याप्रसंगी, एस एस टी महाविद्यालयाचे संस्थापक, प्राचार्य डॉ जे. सी पुरूस्वानी, उल्हासनगर महापालिका उपायुक्त अजय साबळे, क्रिडा अधिकारी शांताराम चौधरी, आय क्यू ए सी समन्वयक डॉ खुशबू पुरस्वानी, विधी अधिकारी राजा बुलाणी, उपप्राचार्य प्रा. जीवन विचारे, आदी मान्यवर उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ दिपक गवादे यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले तर, संजिवनी सांस्कृतिक समितीचे डॉ तुषार वाकसे, प्रा मयुर माथुर, प्रा पद्मा देशपांडे, प्रा हर्षदा दरेकर, यांच्या सह महाविद्यालयाच्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# झिडके-अंबाडी तालुका करा राज्य सरकारला मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**झिडके-अंबाडी:** भिवंडी तालुक्याचे विभाजन होऊन झिडके-अंबाडी नवीन ग्रामीण तालुका स्थापन करण्याची कार्यवाही महाराष्ट्र शासनाकडून सन-1994/95 मध्ये तत्कालीन " विभागीय कोकण आयुक्त जी.बी. पिंगुळकर" यांची नियुक्ती सदर कामी राज्य शासनाकडून करण्यात आली होती,आणि त्यांनीही ही जबाबदारी अत्यंत चांगल्या रितीने पूर्ण करून,शासन स्तरावर अहवाल सादर केलेला आहे ते वर्ष 1994/95. आज या घटनेला तब्बल 31वर्ष पूर्ण झाल्यानंतरही शासनाचे दुर्लक्षित कामी व नियोजित कामी लक्ष वेधून झिडके-अंबाडी ग्रामीण तालुका प्रस्तावाची अंमलबजावणी तातडीने होण्यासाठीच "माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भिवंडी " चे पदाधिकारी- विजय गायकवाड (सरचिटणीस),शांताराम गो. पाटील (अध्यक्ष), नवसु पाटील (उपाध्यक्ष),शामराव भोईर (कार्याध्यक्ष),दत्तात्रय पाटील (सदस्य) आदि शिष्टमंडळाने राज्याचे " महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे" यांना निवेदन सादर करून,प्रत्यक्ष चर्चा केली,त्याचक्षणी मंत्री महोदयांकडून सदर निवेदनावर लेखी अभिप्रायासह संबंधित विभागाकडे कार्यवाहीकरिता सुपूर्द केले आहे,याबद्दल महसूल मंत्री महोदय यांचे महासंघाकडून आभार व्यक्त केले जात आहेत.

प्रस्तावित झिडके-अंबाडी ग्रामीण तालुक्याची मागणी रास्त का आहे,तर भिवंडी सारख्या प्रचंड लोकसंख्या समाविष्ट असणाऱ्या शहराच्या ठिकाणी तालुक्याचे मुख्यालय असल्यामुळे ग्रामीण भागातील जनतेची विविध स्वरूपातील कामे वेळीच व अपेक्षित त्या कालावधीत होत नाहीत.त्याकरिता झिडके-अंबाडी हे ठिकाण ग्रामीण भागातील भौगोलिक दृष्टीकोनातून जनसंपर्कासाठी योग्य असेच ठिकाण आहे,विविध स्वरूपातील रस्त्ये,मार्ग,महामार्गांने जोडणारे हे ठिकाण आहे,तसेच या ठिकाणी ग्रामीण भागातील जनतेला नवीन तालुका निर्माण करून,आजपर्यंत सोई-सुविधांने उपेक्षित असणाऱ्या भागाचा विकासात्मक न्याय देण्याचे काम राज्य शासनाने करावे,याकरिता "माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भिवंडी तालुका " सक्रीय सहभागी राहून पाठपुरावा करणार आहे.याकामी भिवंडी ग्रामीण भागातील जनतेने आपले सर्वतोपरी योगदान द्यावे,असे जाहीर अवाहन महासंघाकडून करण्यात येत आहे.

# श्रीराम कथा निमित्त कलश यात्रेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** :उत्तर भारतीय जनसहयोग संस्थेच्या वतीने इंदिरानगर, वागळे इस्टेट, ठाणे येथील रुपादेवी मंदिरामध्ये दिनांक 26 जानेवारी ते 01 फेब्रुवारी 2025 या कालावधीमध्ये श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे. दिनांक 26 जानेवारी रोजी इंदिरानगर, साठेनगर, रुपादेवी मंदिर या मार्गे परिसरामध्ये कलश यात्रा काढण्यात आली होती. या यात्रेमध्ये शेकडो महिला डोक्यावर कलश घेऊन सहभागी झाल्या होत्या. दररोज सायंकाळी चार ते रात्री नऊ वाजेपर्यंत कथावाचक पंडित धीरज कृष्णदास महाराज यांच्या अमृतवाणीमधून कथा सांगितली जात आहे. तरी परिसरातील भक्तांनी या श्रीराम कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन उत्तर भारतीय जनसहयोग संस्थेचे अध्यक्ष संजय झा यांनी केले आहे.

जगात दोन प्रयागराज आहेत. एक चल आणि दुसरे अचल. अचल प्रभागराज येथे सध्या महाकुंभ सुरू आहे. या महाकुंभामध्ये स्नान करण्यासाठी शेकडो सनातनी जात आहेत. आपण सुद्धा भाग्यवान आहोत कारण आपण सर्वजण चल प्रयागराज मध्ये आहोत ज्या ठिकाणी श्रीराम कथा, भागवत कथा व अन्य कथांचे वाचन केले जाते. तो परिसर स्वतः प्रयागराज बनलेला असतो असे कथाकार पंडित धीरज कृष्णदास महाराज यांनी राम कथामध्ये सांगितले.

# भिवंडी महानगरपालिका राबविणार
# कुष्ठरुग्ण शोध अभियान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : समाजात असलेल्या पत्येक संशयित कुष्ठरुग्णांचा शोध पथकामार्फत शोध घेऊन त्याचे निदान निश्चित करणे व निदान झालेल्या कुष्ठरुग्णांना तात्काळ बहुविधा औषधोपचार सुरु करण्याससठी केंद्र शासनाने कुष्ठरुग्ण शोध अभियान सुरु केले आहे. हे अभियान ३१ जानेवारी ते १५ फेब्रुवारी एकुण १४ दिवसाचे असणार आहे. या अभियानात अति कुष्ठरुग्णभार असलेलल्या व मुंलांचे तसेच विकृती २ कुष्ठरुग्णांचे प्रमाण जास्त असलेल्या जिल्हयातील शहरी भागातील जोखीमग्रस्त लोकसंख्या असणाऱ्या भागाध्ये राबविण्यात येणार आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जोखीमग्रस्त लोकसंख्या असणाऱ्या भागाध्ये राबविण्यात येणार आहे. जोखीमग्रस्त भागात प्रत्येक घरातील सर्व सदस्यसंची कुष्ठरोगा बदल वैद्यकिय तपासणी आशा वर्कर व पुरुष स्वयंसेवक यांच्या मार्फत करण्यात येणार आहे. तरी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांनी सहकार्य करावे असे अहवान मा. श्री. अजय वैद्य (प्रशासक तथा आयुक्त) व मा. श्री. डॉ. संदिप गाडेकर (मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी), डॉ. बुशरा सय्यद (शहर क्षयरोग वैद्यकिय अधिकारी) भिवंडी मनपा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. ३० जानेवारी राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमातंर्गत स्पर्श जनजागृती अभियानांतर्गत मा. श्री. अजय वैद्य (प्रशासक तथा आयुक्त) व मा. श्री. डॉ. संदिप गाडेकर (मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी) डॉ. बुशरा सय्यद (शहर क्षयरोग वैद्यकिय अधिकारी) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनाखाली रन फॉर लेप्रसी मॅरेथॉन, कुष्ठरोग जनजागृती रॅली, त्वचारोग शिबीर, निबंध स्पर्धा, महिला मंडळ सभा, विकृती पडताळणी शिबीर, व खाजगी वैद्यकीय व्यावसायिक निरंतर वैद्यकीय शिक्षण इत्यादी, कार्यक्रमांचे आयोजन कुष्ठरोगा बदल समाजामध्ये असलेले गैरसमज दूर करण्यासाठी शासन स्थरावर विविध कार्यक्रांचे आयोजन करण्यात येत आहे. कुष्ठरोग हा जंतुमूळे होणारा आजार आहे. कुष्ठरोग हा मंदगतीने वाढणारा आजार आहे. याची लक्षणे दिसण्यासाठी कमीत कमी तीन ते दहा वर्षाचा कालावधी जातो. याचे मुख्य लक्षण म्हणजे न खाजणारा न दुखणारा लालसर पांढरा चटटा हे आहे. शरीरावर गाठी येणे, कानाच्या पाळ्या जाड होणे, चेहरा तेलकट होणे हे लक्षणे प्रामुख्याने आढळतात. बहुविध औषधोपचाराने कुष्ठरोग बरा करणे शक्य झाले आहे. कुष्ठरोगावर वेळेत उपचार घेतल्यास लवकर व पूर्णपणे बरा होतो. समाजांमध्ये कुष्ठारोगाबदल असलेले गैर समज दूर करुन कुष्ठरुग्णांना समाजामध्ये चांगली वागणूक देण्याकरीता जनजागृती करणे हा मूळ उददेश आहे.





"कुष्ठरोगाबाबत एकत्रितपणे जनजागृजी वृध्दींगत करु, त्याबाबतचा गैरसमज दूर करू व कुष्ठरोगाने बाधित एकही व्यक्ती मागे राहणार नाही याची दक्षता घेऊ."

# 'व्हॉटसअप, ई- मेलद्वारे पाठवलेली नोटीस ग्राह्य नाही'
# सुप्रीम कोर्टाचे महत्वाचे निर्देश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने आता व्हॉट्स अॅप किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोटीस पाठवण्यास बंदी घातली आहे. सर्वोच्च न्यायालयाने पोलिस विभागांना सीआरपीसीच्या कलम ४१अ किंवा बीएनएसएसच्या कलम ३५ अंतर्गत आरोपींना नोटीस बजावण्यासाठी व्हॉट्स अॅप किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करू नये असे निर्देश दिले आहेत.न्यायालयाने स्पष्ट केले की अशा नोटिसा केवळ सेवेसाठी विहित केलेल्या पारंपारिक पद्धतीनेच जारी केल्या पाहिजेत.या दोन्ही तरतुदींनुसार, दखलपात्र गुन्ह्याचा तपास करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याला प्रथम संशयिताला हजर राहण्यास सांगणारी नोटीस बजावावी लागेल. जर संशयित व्यक्ती पोलिस अधिकाऱ्यासमोर हजर झाला आणि तपासात सहकार्य केले तर त्याला अटक केली जाणार नाही. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की पोलिसांनी कलम ४१अ अंतर्गत नोटीस न बजावता अटक करण्याच्या अधिकाराचा गैरवापर केला आहे.न्यायालयीन मित्र ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा यांच्या सूचना स्वीकारून, न्यायमूर्ती एमएम सुंदरेश आणि राजेश बिंदल यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला आहे. त्यात म्हटले आहे की सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी त्यांच्या पोलिस यंत्रणेला बीएनएसएस २०२३ ने निश्चित केलेल्या मानकांनुसारच नोटीस बजावण्याचे आदेश द्यावेत.सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले आहे की व्हॉट्सअॅप किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवलेली नोटीस बीएनएसएस २०२३ ने ठरवलेल्या मानकांची पूर्तता करत नाही. लुथरा यांनी या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निर्णयाचा हवाला दिला. या निर्णयात, सर्वोच्च न्यायालयाने पोलिसांना सीआरपीसीच्या कलम ४१अ चे पालन न करता एखाद्या व्यक्तीला अटक करण्यापासून रोखले होते. त्या माणसाने असा गुन्हा केला होता ज्यामध्ये त्याला सात वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. जामीनपत्रे आणि जामिनाची रक्कम भरण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे तुरुंगात असलेल्या अनेक गरीब कैद्यांच्या मुद्द्यावर, अॅमिकस क्युरीने न्यायालयाला सांगितले की राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरणाने अशा कैद्यांना त्यांचे सत्यापित आधार कार्ड आणि वैयक्तिक जामीन सादर केल्यानंतर सोडण्याच्या त्यांच्या सूचनेला तत्वतः सहमती दर्शविली आहे.तथापि, आधार कार्ड सादर करून वैयक्तिक जामीनावर अशा कैद्यांना जामीन मंजूर करण्याच्या प्रक्रियेच्या अंमलबजावणीच्या पद्धती तयार करायच्या असल्याने, खंडपीठाने या संदर्भात एक प्रक्रिया विकसित करण्यासाठी कायदेशीर सेवा प्राधिकरणासोबत काम करण्याचे निर्देश मित्राला दिले.




# कल्याण जिल्हा न्यायालयामध्ये रंगला
# हळदी कुंकवाचा सोहळा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये कल्याण वकील संघटनेच्या महिलांनी सन्माननीय महिला न्यायाधीश, न्यायालयीन कर्मचारी, न्यायालयात कर्तव्यावर असणारे महिला पोलीस, वकील भगिनी यांनी हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या हळदी कुंकवाच्या कार्यक्रमांमध्ये कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष अॅडप्रकाश जगताप यांनी महिलांकरिता लकी ड्रॉ ठेवले होते. लकी ड्रॉ मध्ये स्वराज्य सारथी जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज शिवचरित्र, जग बदलणारा बाप माणूस, रमाई, भारतीय संविधान , भगवतगीता हे पुस्तके लकी ड्रॉ मार्फत महिला वकील भगिनींना देण्यात आली. अॅड.प्रदीप बावस्कर यांच्याकडून पैठणीसाठी लकी ड्रॉ काढण्यात आला. अॅड.विनया पाटील यांना पैठणीचा मान मिळाला. दरम्यान न्यायालयातील सर्व वकिलांनी अतिशय छान व सुंदर अशा कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते आशी माहिती कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष अॅड.प्रकाश रा. जगताप यांनी दिली.

# पत्रकारांच्या कायदेशीर प्रश्नांसाठी कायदा सेवा कक्ष स्थापन करा
## - डॉ. नीलम गोऱ्हे यांचे निर्देश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
विशेष प्रतिनिधी

मुंबई : आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील पेन्शन, नियम व अटी शिथिल करून ज्येष्ठ पत्रकार/छायाचित्रकार यांना योजनेचा लाभ मिळण्याबाबत विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनात बैठक झाली. ज्येष्ठ अधीस्वीकृती पत्रकार कार्ड व आयकर भरावा लागत नाही या दोन कागदपत्रकारांच्या आधारे पेन्शन प्रकरणे मंजूरीचा निर्णय मंत्रालयीन अधिस्वीकृती समितीने घ्यावे असे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या.

राज्य सरकारने सुरू केलेल्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेंतर्गत १८६ पत्रकारांना पेन्शन योजना सुरू आहे. या योजनेकरिता ५० कोटींची तरतुद करण्यात आली असून दरम्यान, ज्येष्ठ अधिस्वीकृती पत्रकारांना पेन्शन योजनेचा लाभ मिळण्याकरिता अनेक अटी, शर्तीतून जावे लागत आहे. याबाबत कोल्हापूर प्रेस क्लबच्या निवेदनातून विविध मुद्दे या बैठकीत मांडण्यात आले.

पत्रकारांना विशिष्ट आजारांसाठी शासनाच्या योजनांमधून वैद्यकीय मदत मिळत असली तरीही नियमित आजारांसाठी वैद्यकीय मदत प्राप्त व्हावी याकरिता सीएसआर फंडातून निधी प्राप्त करण्याचा प्रयत्न करा, पत्रकारांसाठी कायदा सहाय्य कक्ष तयार करा, ज्येष्ठ सेवा प्राधिकरणांतर्गत पत्रकारांच्या समस्या दूर करा, असे निर्देशही डॉ. नीलम गोऱ्हे यांनी माहिती संचनालय विभागाला दिल्या.

ज्येष्ठ अधिस्वीकृती पत्रकार सन्मान योजनेतील सदस्यांची भविष्यातील वाढती संख्या लक्षात घेता, अधिक निधीचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर करावा असेही सांगण्यात आले. त्याचबरोबर, पेन्शन योजना लागू होण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तसेच, कार्यालयीन कर्मचारी असल्याच्या नोंदी ठेवण्याबाबत सर्व संपादकांना पत्र पाठवणार असल्याचे डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या. काही पत्रकार ज्या प्रसारमाध्यमात काम करत होते, त्यापैकी काही दैनिक सध्या अस्तित्वात नसल्याने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होऊ शकत नाही, तसेच इतरही अडचणी लक्षात घेता, एक समिती गठित करावी असे निर्देशही डॉ. गोऱ्हे यांनी दिले.

या बैठकीला माहिती संचनालय विभागाचे संचालक दयानंद कांबळे, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहार संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, सरचिटणीस प्रवीण पुरो, माजी अध्यक्ष मंदार पारकर, कोल्हापूर प्रेस क्लब अध्यक्ष शीतल धनवडे, उपाध्यक्ष प्रशांत आयरेकर, संचालक समीर मुजावर, दीपक जाधव, मीडिया असोसिएशन ऑफ इंडियाच्या संस्थापक अध्यक्ष शीतल करदेकर, कोशाध्यक्ष चेतन काशीकर मीडिया असोशिएशन ऑफ इंडिया, कोल्हापूर संस्थापक शेखर धोंगडे उपस्थित होते.



# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते
# जगन्नाथ शिंदे यांचा नागरी सत्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रॅगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांचा अमृत महोत्सवी सत्कार सोहळा कल्याण पूर्वेतील पोटे मैदानात संपन्न झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते शिंदे यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी जगन्नाथ शिंदे यांच्या आयुष्यावरील रथ जगन्नाथाचा या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तर एकाच दिवशी 80 हजारहून अधिक रक्तदान केल्याबद्दल गिनीज वर्ल्ड रेकॉर्डबूक मध्ये नोंद करण्यात आली असून त्याचे प्रमाणपत्र देखील देण्यात आले.

जगन्नाथ शिंदे केमिस्ट रत्न म्हणून संपूर्ण देशात परिचित आहेत. ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट महासंघाचे अध्यक्ष आहेत. तुमचा शतकमहोत्सवी सोहळा साजरा करण्याची संधी आम्हाला मिळावी एवढीच इच्छा याप्रसंगी एकनाथ शिंदे यांनी बोलताना व्यक्त केली. कोरोना काळात अप्पा शिंदे यांनी केलेलं काम कधीही विसरता येणार नाही. रेमडेसिवीर यांसारखी त्यावेळी दुर्मीळ झालेली औषधे त्यांनी उपलब्ध करून दिली. सर्वसामान्यांच्या जीवन मरणात महत्त्व असलेल्या औषधांचा पुरवठा करूनही त्यांची नाळ कायमच सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेली आहे. एका दिवसात ८० हजार बाटल्या रक्त त्यांनी जमा करून दाखवले होते. त्यामुळे आप्पा तुम्ही यापुढेही कायम दवा देत रहा आणि दुवा घेत रहा असे सांगत एकनाथ शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार राजेश मोरे, आमदार सुलभा गायकवाड, आमदार किसन कथोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रमोद हिंदुराव, कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, कल्याण डोंबिवली मनपा आयुक्त इंदूराणी जाखड आदींसह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

# आमदार रवींद्र चव्हाण यांच्या सुचनेनंतर
# डोंबिवली पश्चिमेकडील पाणी प्रश्नावर तोडगा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत आयोजित बैठकीत डोंबिवली पश्चिम भागातील पाणी पुरवठा बाबत चर्चा करण्यात आली होती. त्यावेळी चव्हाण यांनी डोंबिवली पश्चिम वृंदावन येथील संपपंपच्या जागी असलेले अतिक्रमण हटवून संपपंपची उभारण्याचे काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या होत्या. त्याची अंमलबजावणी त्वरित झाली असून आता तो अडसर दूर झाला आहे.

चव्हाण यांच्या सूचनानंतर महानगरपालिका प्रशासनाने संप पंपाच्या कामात अडथळा ठरणारे अतिक्रमण हटवलेले असून पाणीपुरवठा करणाऱ्या संप पंपाचे काम वेगाने सुरू करण्यात आलेले आहे. वृंदावन येथील जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा व जलवाहिन्यांच्या आराखड्यासाठी आयआयटी मुंबईचे तज्ञ डॉक्टर अनुज कुमार घोरपडे यांनी विकसित केलेल्या शाफ्ट आणि मॅनिफोल्ड टेक्नॉलॉजी चा वापर करण्यात येणार असून या टेक्नॉलॉजी मुळे उंच सखल भागात एकसमान दाबाने पाणीपुरवठा करणे शक्य होणार आहे त्यामुळे राजू नगर व कुंभारखाण पाडा परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत होऊन नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटणार असल्याचा विश्वास चव्हाण यांनी व्यक्त केला.

# गडकरी रंगायतनच्या दुरुस्तीचे काम सुरू
# नव्या रंगायतनची आसन क्षमता १२०ने कमी होणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाण्यातील सांस्कृतिक केंद्र असलेल्या राम गणेश गडकरी रंगायतनच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले आहे. परंतु, आता नव्याने होऊ घातलेल्या रंगायतनमध्ये आरामदायी खुर्च्यांचा अनुभव प्रेक्षकांना घेता येणार आहे. त्यामुळे रंगायतनमधील आसन क्षमता कमी होणार असून, आता ९६० प्रेक्षक बसू शकणार असल्याची माहिती पुढे आली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी कॅप्सूल लिफ्ट, दोन वाढीव शौचालये आणि ४७ वर्षांनंतर येथील पडदा बदलला जाणार असून, त्याच महिलेला पुन्हा तसाच पडदा बनविण्याचे काम देण्यात आले आहे. सन १९७८मध्ये बांधलेल्या रंगायतनची आसनक्षमता सध्या १,०८० एवढी आहे. पूर्वी आखूड खुर्च्या होत्या. त्यामुळे बसण्यासही रसिकांना त्रास होत होता. आता येथे आरामदायी खुर्च्या बसविल्या जाणार आहेत. त्यामुळे आसनक्षमता १२०ने कमी होणार आहे. याशिवाय या ठिकाणी येणाऱ्या ज्येष्ठांना आता पायऱ्या चढाव्या लागणार नाहीत. त्यांना या ठिकाणी पारदर्शक पद्धतीची कॅप्सूल लिफ्ट उपलब्ध करून दिली जाणार आहे. सध्या या ठिकाणी अवघ्या दोन ते तीन तिकीट खिडक्या आहेत. परंतु, आता या खिडक्यांची संख्या वाढविली जाणार आहे. या ठिकाणी आता सहा खिडक्या होणार आहेत.

गडकरी रंगायतनचा पडदा खादी आणि गादीच्या कापडाचा वापर करून ४७ वर्षांपूर्वी अवघ्या २० हजारांत नंदा चारी या विद्यार्थिनी असताना तयार केला गेला. परंतु, आता त्याच पद्धतीचा अगदी तसाच पडदा तोदेखील नंदा यांच्याच हातून तयार करण्यासाठी पालिकेने पावले उचलली आहेत. त्यानुसार आता पडद्याचे कामही सुरू झाले असून, त्यावर २२ लाख रुपये खर्च होणार आहे.

कामे मुख्य वास्तूचे मजबुतीकरण, तालीम हॉलचे नूतनीकरण, मुख्य प्रेक्षागृहातील संपूर्ण आसनव्यवस्था बदलणे, रंगकर्मींसाठी असलेल्या ग्रीन रूममध्ये आवश्यक सुधारणा करणे, रंगमंच - फ्लोरिंग अद्ययावत करणे, वातानुकूलित यंत्रणेत सुधारणा, शौचालयांचे संपूर्ण अद्ययावतीकरण आदी कामांचा समावेश असल्याचे आहे. या कामासाठी २३ कोटींचा खर्च केला जाणार आहे. राज्य शासनाकडून



# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा पेपर फुटल्याचा आरोप खोटा
## - सचिव डॉ. सुवर्णा खरात



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : ४० लाख रुपये दिल्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २ फेब्रुवारीला होणा-या परिक्षेची प्रश्नपत्रिका देतो असे सांगणारे फोन आल्याने उमेदवारांमध्ये गोंधळ उडाला होता. गुरुवारी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सचिवांनी नवी मुंबईत (बेलापूर) पत्रकार परिषद घेऊन २ फेब्रुवारीला होणा-या परिक्षेच्या सर्व प्रश्नपत्रिका सूरक्षित कडेकोट पोलीस बंदोबस्तामध्ये असून उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन केले. परीक्षार्थी उमेदवारांनी याबाबत आयोगाकडे केलेल्या इ मेलवरील तक्रारींमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने पुणे पोलीस आयुक्तांकडे याबाबत गुरुवारी लेखी तक्रार केल्याची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सचिव डॉ. सुवर्णा खरात यांनी दिली.

# बेलापूर कौटुंबिक न्यायालयात
# सुकून प्रकल्प सेंटरचे उद्घाटन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे, दि.30 :- कौटुंबिक न्यायालय, बेलापूर येथे दि.01 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 10 वाजता "सुकून प्रकल्प" सेंटरचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. तरी, या कार्यक्रमाकरिता इच्छुक नागरिकांनी, विधी व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींनी, प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन बेलापूर नवी मुंबई वकील संघाचे अध्यक्ष अॅड.सुनिल मोकल आणि कौटुंबिक न्यायालय, बेलापूरच्या न्यायाधीश डॉ.रचना तेहरा यांनी केले आहे.

# ठाण्यातील घरांच्या किंमतीत १८ टक्क्यांनी वाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : भारताची आर्थिक राजधानी आणि बहुसंख्य नागरिकांच्या स्वप्नांना आकार देणारी मायानगरी अशी ओळख असलेल्या 'मुंबई' शहरात स्वतःच्या हक्काचे घर असावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते. परंतु याच मायानगरीत स्वतःचे घर घेणे आव्हानात्मक झाले आहे. तुलनेत २०२४ या वर्षात मुंबई महानगर क्षेत्रातील घरांच्या किंमतीत तब्बल १८ टक्के वाढ झाली आहे. सर्वाधिक म्हणजे तब्बल ४९ टक्के वाढ ही दिल्लीतील मालमत्तेच्या किंमतीत झाली आहे. सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावणारी ही आकडेवारी प्रॉपटायगर डॉटकॉमच्या 'रिअल इनसाइट रेसिडेन्शिअल अॅन्युअल राऊंडअप २०२४' या अहवालातून समोर आली आहे.

मालमत्तेच्या किंमतीत वाढ का?

बांधकामाचे क्षेत्राशी संबंधित साहित्याच्या वाढत्या किंमती, कामगारांची वाढती मजुरी आणि शहरातील गगनचुंबी इमारतीतील प्रशस्त घरांसाठी असलेली मोठी मागणी, या सर्व बाबी देशातील प्रमुख शहरांतील मालमत्तेच्या किंमतीत वाढ होण्यास कारणीभूत ठरल्या आहेत. तसेच मोठमोठे व्यावसायिक, बॉलिवूड अभिनेते आणि क्रीडापटू मुंबईत राहत असल्यामुळे जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या या देशात 'मुंबई' ही सर्वात महागडी निवासी बाजारपेठ असल्याचे देखील या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

# शासकीय महाविद्यालय सुरु होणे आवश्यक

– माजी आमदार राजेश पाटील



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : राजेश पाटील माजी आमदार बोईसर विधानसभा. यांनी माणिकराव कोकाटे - कृषी मंत्री महाराष्ट्र यांची मुंबई येथे जाऊन भेट घेतली. पालघर जिल्ह्यात सुरू करण्यात येणाऱ्या, शासकीय कृषी आणि मत्स्य महाविद्यालयाची प्रक्रिया शेवटच्या टप्प्यात असून. ती प्रकिया पुर्ण करून, लवकरात लवकर शासकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी महत्वपुर्ण सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी विनायक काशिद- बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठाचे सिनेट मेंबर यांची उपस्थित महत्त्वाची होती.

पालघर जिल्ह्यातील लागवड करीत असलेले शेतकरी / बागायतदार यांच्या साठी संशोधन केंद्रे आणि कृषी क्षेत्रातील नवनविनकल्पना विकसित करण्यावर विशेष भर देणे कामी. तसेच वसईची प्रसिद्ध असलेली जुनी लाल केळी, सफेद वेलची, आणि मोगरा यांसारख्या पिकांसाठी विशेष संशोधन व मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यावर सकारात्मक चर्चा करण्यात आली. त्याच प्रमाणे पारंपारिक भात शेती आणि शेतीला पूरक व्यवसाय यांना चालना देण्यासाठी कृषी विद्यापीठामार्फत पालघर जिल्ह्यात कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि मार्गदर्शन शिबिरे नियमित पणे राबवण्यात यावे. या उपक्रमांमुळे पालघर जिल्ह्यातील शेतकरी अधिक सक्षम, समृद्ध आणि आत्मनिर्भर होईल,आणि तरुण मुलांना शेती विषयक व मत्स्य शेती विषयावर चांगल्या प्रकारे शिक्षण घेऊन तरूण शेतकरी, शेती क्षेत्रात नक्कीच प्रगती करेल. असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यासाठी पालघर जिल्ह्याच्या कृषी व मत्स्य शेती व्यवसायाच्या विकासासाठी रचनात्मक उपाययोजना राबवण्यासंदर्भात सखोल चर्चा झाली. लवकरच या विषयावर पुढील पावले उचलण्यात येणार असून, जिल्ह्यातील कृषी क्षेत्राच्या वाढीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी मंत्री यांनी सकारात्मक भुमिका घेत, यावर लवकरच कार्य सुरू करणारे आहे.

# पडघा सेवा सहकारी सोसायटीच्या सभापतीपदी रमेश पाटील

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील विविध गावातील शेकडो सभासद संख्या असलेल्या पडघा गृप विवीध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या सभापतीपदी रमेश पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

मावळते सभापती गुरुनाथ मते यांनी राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार निवडणूक अध्यासी अधीकारी एल. व्ही भेरे यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा सोसायटीच्या कार्यालयात घेण्यात आली यावेळी सभापती पदासाठी रमेश रामचंद्र पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची सभापती पदावर निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.



यावेळी 13 संचालकापैकी उपसभापती सुरेश पाटोळे, दत्तात्रेय पाटोळे, डॉ. संजय पाटील, गुरूनाथ मते, वंसत म्हात्रे, देवीदास पाटील, भारती घावट, अंजना पाटील, दिलीप पाटील, राजाराम जाधव, दिपक जाधव हे संचालक उपस्थित होते. तर सभापती पदावर पाटील यांची निवड होताच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था भिवंडी बाळासाहेब पाटील, सचीव ज्ञानेश्वर म्हात्रे, डोहोळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य सचीन घोडविंदे, शिवसेना ठाकरे गट उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर, तळवली सेवा सोसायटीचे सभापती काशीनाथ शेलार माजी सभापती अजय पाटील अरुण गोरले कुंरुद सोसायटीचे संचालक भगवान सांबरे, मोहन पालवी, चंद्रकांत पाटील,राहुल पाटील सहसचिव शितल कशीवले यांनी पाटील यांना शुभेच्छा दिल्या. तर आन्हे गावातील पाटील कुंटबीयांना बऱ्याच वर्षानंतर पडघा सोसायटीवर सभापती पदाचा मान मिळाल्याने आन्हे गावातील नागरिकांनी फटाक्यांच्या आतषबाजीत जल्लोष केला.

# मुंबईत हापूस दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : वाशीच्या एपीएमसी बाजारात सोमवारी कोकणातील हापूस आंब्याच्या २४ पेट्या दाखल झाल्या असून त्याची विधिवत पूजा करून हंगामाला सुरुवात करण्यात आली. यंदा हवामान बदलाने हापूसच्या उत्पादनाला फटका बसला. हापूसला मोहोर फुटण्याची वेळ आणि हवामान बदल, परतीचा पाऊस तसेच कडाक्याची थंडी त्यामुळे अतिमोहोर फुटला. त्यामुळे बहुतांश ठिकाणी फळधारणा झाली नाही. थ्रिप्स रोगामुळेदेखील मोहोर गळून गेला. सोमवारी बाजारात कोकणातील हापूसच्या २४ पेट्या दाखल झाल्या



होत्या. दाखल झालेल्या हापूसची ४ ते ६ डझनाची एक पेटी १० हजार ते १५ हजार रुपये बाजारभावाने विक्री होत आहे. दरम्यान, यावर्षी हापूसचे उत्पादन चांगले असेल. हंगामाला एक महिना उशिराने सुरुवात होत असून १५ मार्च नंतर बाजारात हापूसची आवक वाढणार आहे, अशी माहिती एपीएमसी फळबाजारचे संचालक संजय पानसरे यांनी दिली.

# रिक्षा चालकांच्या ऑनलाईन तक्रारीसाठी क्रमांक उपलब्ध

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण कार्यालयाने ऑटोरिक्षा चालकाद्वारे मोटार वाहन नियमांचे उल्लंघन करून जादा भाडे आकारणी, जादा प्रवासी वाहून नेणे, भाडे नाकारणे, प्रवाशांसी उध्दट वर्तन करणे, शिवागाळ करणे इ. गुन्ह्यांकरिता ऑटोरिक्षा प्रवाशांसाठी ऑनलाईन तक्रार करण्यासाठी मोबाईल क्र. 9423448824 (Whatsapp) उपलब्ध करून देण्यात आला आहे. ऑटोरिक्षा चालकाने कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा केल्यास प्रवाशाने ठिकाण, दिनांक, वेळ व गुन्ह्याचे स्वरुप, फोटो इ. तपशिलासह वरीलप्रमाणे नमूद व्हॉटस्अप क्रमांकावर तक्रार दाखल करावी. या तक्रारीची दखल घेवून ऑटोरिक्षा चालकावर मोटार वाहन नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असे कल्याण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.

# क्रांती शुगरवर गुन्हे दाखल करण्यास जिल्हा न्यायालयाची स्थगिती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पारनेर : देवभोयरे - पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथील क्रांती शुगर वर पारनेर न्यायालयाने गुन्हे दाखल करण्याच्या आदेशाला जिल्हा व सत्र न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे .

पारनेर तालुक्याची कामधेनू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पारनेर सहकारी साखर कारखान्याच्या विक्री संदर्भात पारनेर न्यायालयात अॅड . रामदास घावटे व इतरांनी दाखल तक्रारीच्या अनुषंगाने प्रथम न्यायदंडाधिकारी यांनी दि १० रोजी दिलेल्या तपास व गुन्हा दाखल करण्याच्या आदेशास नगर येथील प्रधान व सत्र न्यायालयाने दि . २४ रोजी स्थगिती आदेश दिल्याने आदेशाने अॅड . रामदास घावटे यांनी सुरू केलेले उपोषण मागे घेतले आहे . त्यांनी पारनेर कारखाना विक्री संदर्भातील तथाकथित बोगस कर्ज प्रकरण , बोगस गहाणखत व सदरील कर्ज वसुली प्रकरणी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी २०१५ मध्ये जाहिर लिलावाद्वारे विक्री केलेल्या व्यवहारासंदर्भात अनियमितता



झाल्याचा आरोप करून सर्वप्रथम पारनेर येथील न्यायदंडाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती, परंतु सदरील तक्रार दि २५ एप्रिल २०२४ रोजी फेटाळली होती , त्यानंतर अॅड . घावटे यांनी नगर येथील जिल्हा व सत्र न्यायालय दुसरी तक्रार दाखल केली, ही तक्रार देखील जिल्हा व सत्र न्यायालयाने दि . १५ जून २०२४ रोजी फेटाळली , त्यानंतर त्यांनी पारनेर येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांकडे नव्याने तक्रार दाखल करून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अधिकारी व क्रांती कारखान्याचे संचालक मंडळ यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४०६ , ४६८ , ४७१ सह ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याचे व पुढील तपास करण्याचे आदेश द्यावेत , अशी विनंती दाखल केली होती. पारनेर येथील प्रथम वर्ग दंडाधिकारी यांनी दि . १० जानेवारी रोजी आदेश देऊन पारनेर पोलीसांनी सदरील तक्रारीच्या अनुषंगाने तपास करून गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले . त्यावर क्रांती शुगर कारखान्याच्या पदाधिकारी व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या अधिकाऱ्यां नी जिल्हा व सत्र न्यायालयात पुर्णनिरीक्षण अर्ज दाखल करून पारनेर न्यायालयाच्या निकालाला आव्हानीत केले . त्याचा विचार करून जिल्हा न्यायालयाने पारनेर न्यायालयाच्या निकालाला तात्पुरती स्थगिती दिली .

## मोफत शिक्षणासाठी

# संदिप पाटील यांचे बेमुदत उपोषण सुरू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : आचार्य विनोबा भावे यांच्या जन्मगावी गागोदे बुद्रुक येथे 30 जानेवारी पासून समाजासाठी मोफत शिक्षण मिळावे याकरिता संदिप रेणूका परशूराम पाटील यांनी शिक्षण हक्क सत्याग्रह बेमुदत उपोषणाला सुरुवात केली असून नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.

अर्थिकदृष्ट्या सर्व समाज मागासलेला आहे. कंत्राटी कामगार इको- मिनीडोअर चालक, रिक्षा चालक, टेम्पो चालक वीट भट्टी कामगार, कोळसा भट्टी कामगार, हंगामी मजूर, शेतमजूर, घरेलू कामगार, रस्त्यावरील भाजीपाला विक्रेते, छोटे व्यवसायिक यांचे मासिक उत्पन्न ५ हजारापासून १२ हजार रुपयांवर आले आहे. महागाईमुळे सर्वसामान्य माणसाचे जगणे हे मुश्किल झालेले आहे.

रायगड जिल्ह्यातील पटसंख्या अभावी ३०० हून अधिक शाळा बंद झालेल्या आहेत आणि महाराष्ट्रातील १४ हजार शाळा बंद होण्याच्या स्थितीत आहेत. याचा अर्थ रायगड जिल्ह्यातील तीनशे गावातील मुलांना शिक्षण विकत घ्यावे लागत आहे आणि महाराष्ट्रातील १४ हजार गावातील




मुलांना शिक्षण विकत घ्यावे लागणार आहे.

सद्या शिक्षणाच्या खाजगीकरणाने शैक्षणिक फी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे त्यामुळे आपल्या मुलांना शिकवायचे कसे हाच प्रश्न सर्व समाजाला सतावत आहे. पहिलीच्या मुलांसाठी शैक्षणिक खर्च ३५ ते ४० हजार रुपये, अकरावी बारावीच्या मुलांचा शैक्षणिक खर्च २ ते ३ लाख रुपये, एमबीए साठी शैक्षणिक खर्च ५ ते ६ लाख रुपये, इंजिनीयर होण्यासाठी खर्च १२ ते १५ लाख रुपये, डॉक्टर होण्यासाठी ६० ते ७० लाखापेक्षाही खर्च होते. आज शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे सर्व समाजातील गरिबांची मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकली गेलेली आहेत. भारतीय संविधानानुसार शिक्षण हे आपले मूलभूत हक्क आहे. ज्ञाना अभावी माणसाची विचार करण्याची शक्ती थांबते आणि माणूस सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेला राहतो. म्हणून ज्ञान हे प्रत्येक व्यक्तीचा नैसर्गिक अधिकार असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला मिळालेच पाहिजे.

समाजाला अंगणवाडी ते पदव्यत्तर, पीएचडी ( इंजिनीअर, वकील, डॉक्टर, एमबीए वगैरे) पर्यंतचे मोफत शिक्षण मिळावे, रोजगार हमी कायदा अंमलबजावणी करणे, कंत्राटी कामगार कायदा रद्द करावे तसेच अन्य मागण्यांसाठी म्हणून ३० जानेवारी पासून संदीप रेणुका परशुराम पाटील हे बेमुदत उपोषणाला बसले आहेत. आहेत. सर्व समाजाने शिक्षण हक्क सत्याग्रहात सामील व्हावे असे आवाहन करण्यात आलेले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते भालचंद्र पाटील यांना मातृशोक

कल्याण : अटाळी येथील स्थानिक भूमिपुत्र सामाजिक कार्यकर्ते भालचंद्र पाटील यांच्या मातोश्री वनिता पाटील यांचे 20 जानेवारी रोजी दिर्घ आजाराने निधन झाले. वनिता पाटील नेहमीच तळागाळातील वर्गातील समाजासाठी मदतीचा हात देत सुख दुखात धावून जाऊन मदतीचा हात देण्याची त्यांची ख्याती होती. सामाजिक, कला क्रिडा, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान होते. त्यांचा सामाजिक कार्याचा वसा त्याचे पुत्र भालचंद्र पाटील चालवित आहेत. त्यांच्या दुख:द निधनाने समाजातील सर्वच स्तरातून हळ हळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा नातवंडे पुतणे असा मोठा परिवार आहे.

# मंत्री गुलाबराव पाटील करणार पालघर दौरा

– आ.राजेंद्र गावीत



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : पालघर जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा योजनांच्या स्थितीबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासन मंत्रालय पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांची त्यांच्या मुंबई येथील निवास स्थानी जावून. राजेंद्र गावीत आमदार पालघर विधानसभा यांनी प्रत्यक्ष भेट घेतली.

यावेळी पालघर जिल्ह्यातील वाडा पोखरण व 26 गावांची पाणी पुरवठा योजना, झांझरोळी केळवा माहिम प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, सफाळे 26 गावांची नळ पाणी पुरवठा योजना. पालघर शहर व ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना, महाराष्ट्र जल जीवन प्राधिकरण योजना, मोखाडा 54 गावांची नळ पाणी पुरवठा योजना. तसेच वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र सह, वसई ग्रामीण भागातील 69 गावांची नळ पाणी पुरवठा योजना आणि पालघर जिल्ह्यातील पाणीपुरवठ्याच्या प्रलंबित योजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागांतील पाण्याच्या उपलब्धतेची स्थिती, रखडलेल्या योजनांचे प्रश्न, तसेच भविष्यातील उपाययोजनांवर आदी वर यावेळी चर्चा करण्यात आली. तर गुलाबराव पाटील यांनी आमदार गावित सांगत असलेल्या समस्या गांभीर्याने ऐकून घेतल्या. यावर पुढील कारवाई आणि समस्या सोडविण्यासाठी, तसेच पालघर जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी लवकरच गुलाबराव पाटील हे स्वत: पालघर जिल्ह्याचा दौरा करणार असल्याचे आमदार गावित यांनी सांगितले आहे.

या अनुशंगाने पालघर जिल्ह्यातील आदिवासी व ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीपुरवठा प्रश्नांवर तातडीने तोडगा निघण्याची शक्यता असून, पाणी पुरवठा संबंधित अधिकाऱ्यांना, तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. या दौऱ्यात मा. गुलाबराव पाटील हे पालघर जिल्ह्यातील विविध प्रलंबित योजना, स्थानिकांच्या समस्या आणि प्रशासनाची भूमिका यांचा आढावा घेण्यात येणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा योजना मध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.

# पालघरमध्ये झोपडीला आग

## खाक झालेल्या संसाराला एक हात मदतीचा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : पालघर पश्चिमेस असलेल्या लोकमान्य पाडा , येथील सुधीर कोंड्या धापशी व अलका गोविंद धापशी या गरीब हातांवर जगणाऱ्या, आदिवासी समाजाच्या दाम्पत्याच्या झोपडीला अचानक पणे आग लागली, व घरातील संपूर्ण सामानासही जीवनावश्यक वस्तू अन्नधान्य सह संपूर्ण संसार आणि राहत्या झोपडीची ही राख रांगोळी झाली. नशीब बलवत्तर म्हणून सदर कुटुंब अंगावर घातलेल्या कपड्यांशी जिवंत राहिले . या कुटुंबाला अशा परिस्थितीत मायेची सावली म्हणून केदार काळे सामाजिक कार्यकर्ते व उज्वला काळे नगराध्यक्षा पालघर यांनी, सदर



कुटुंबा साधारणपणे एक महिना पुरे एवढे अन्नधान्य व स्वयंपाकाचे सामान, कपडे, ब्लँकेट आदी तातडीची मदत म्हणून, ते राहत असलेल्या लोकमान्य पाडा येथे स्वतः जाऊन त्यांना दिले.

त्यावेळी त्या कुंटुबाचे सातवन करीत काळे यांनी सांगितले, आपले सर्वस्वी अग्नीने हिरावून घेतले आहे. आपली परिस्थिती आम्ही समजू शकतो. त्यासाठी आमच्या कडून जमेल तशी मदत करू. तसेच शासनाच्या तर्फे आपणास ताबडतोब शासकीय मदत मिळावी, किंवा विविध सामाजिक संस्था व क्लब यांच्या मदतीने आपणास हे घर बांधून द्यावे. यासाठी प्रयत्न करू. असे ही सांगितले.

सदर या आगीमुळे धापशी यांची झोपडी संपूर्ण जळून खाक झाली आहे. तर त्या लगतच असलेल्या, अनंता कोंड्या धापशी, गीता गोविंद धापशी, किरण मंगल धापशी यांच्या झोपड्यांना झळ पोचलेली आहे. सुधीर धापशी व अलका धापशी याचे घरा सकट सर्वच जळाल्या ने त्यांना तात्पुरते निवाऱ्यासाठी, पालघर नगर परिषद समाज मंदिर बांधत आहे, त्या समाज मंदिर इमारतीत राहण्याची सोय करण्यात आली आहे.

# १० वी,१२ वीची परीक्षा पुर्वी प्रमाणेच होणार

**ह्यासाठी राज्यातील शिक्षक संघटनांसह सर्व शिक्षक आमदार,स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शिक्षण मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला होता**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : या वर्षी १० वी व १२ वीच्या होणाऱ्या परीक्षांकरीता केंद्र संचालक, पर्यवेक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सरमिसळ करण्याचा निर्णय शिक्षण मंडळाने मागे घेतला असून शिक्षण क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस यांच्या मागणीप्रमाणे या परीक्षा पुर्वीप्रमाणेच होणार असल्याचे प्रकटन बोर्डाने प्रसिद्ध केले आहे.

कॉपी नियंत्रणासाठी १० वी व १२ वी परीक्षांच्या केंद्रांवरील केंद्र संचालक, पर्यवेक्षण करणारे शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्माचाऱ्यांची सरमिसळ करण्याचा निर्णय राज्य शिक्षण मंडळाने घेतला होता. या निर्णयास शिक्षण क्रांती संघटनेने प्रखर विरोध करून बहिष्कार टाकण्याचा तसेच उच्च न्यायालयात जाणार असल्याचा इशारा मंडळाच्या अध्यक्षांना दिला होता.

पर्यवेक्षण व केंद्र संचालन नियोजनाकरीता शिक्षणाधिकारी यांनी शाळांमधून केंद्रसंचालक व पर्यवेक्षकांच्या याद्या मागविल्या होत्या त्या देण्यास शिक्षण क्रांती संघटनेने असहकार सुरू केला होता. अखेरीस त्रस्त झालेल्या शिक्षण मंडळाने सरमिसळीचा निर्णय मागे घेऊन कॉपी नियंत्रणासाठी बैठे पथक, भरारी पथक, जिल्हा व केंद्र स्तरीय दक्षता समिती आदी पुर्वीप्रमाणे सुरू असलेल्या उपाययोजनाच सुरू ठेवण्याचा निर्णय प्रटनाद्वारे जाहीर केला आहे. हा निर्णय रद्द होण्यासाठी अनेक संघटनांनी पुढाकार घेतला होता मात्र शिक्षण क्रांती संघटनेने या आंदोलनाचा तीव्रतेने आरंभ केला होता व जोरकसपणे मागणी लाभन धरली होती अशी चर्चा सर्वत्र आहे.

# महाराष्ट्रातील पहिल्या जलशक्ती केंद्राचे उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे :केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या राष्ट्रीय जलमिशन अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या व भारतीय जैन संघटना (बीजीएस) यांच्या सहकार्याने महाराष्ट्राचे जलसंधारण मंत्री संजय राठोड, जलसंधारण राज्यमंत्री इंद्रनील नाईक व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील यांच्या निर्देशानुसार व जलसंधारण विभागाचे मुख्य अभियंता तथा अप्पर आयुक्त प्रादेशिक क्षेत्र, पुणे सुनिल कुशिरे व ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रादेशिक जलसंधारण अधिकारी सुरज शिंदे यांच्या हस्ते महाराष्ट्रातील पहिल्या जलशक्ती केंद्राचे उद्घाटन कळवा, ठाणे येथे संपन्न झाले.

हे जलशक्ती केंद्र पाण्याच्या संबधित माहिती जलसंधारणाची तंत्रे पाण्याची गुणवत्ता, पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी संसाधन आणि ज्ञान केंद्रे म्हणून काम करतील आणि याबाबत स्थानिक लोकांना पाण्याशी संबंधित सर्व उपक्रमावर तांत्रिक मार्गदर्शन करतील, असे जलशक्ती केंद्राच्या उद्घाटनाप्रसंगी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी सूरज शिंदे यांनी व्यक्त केले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९१९०८२६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024